# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- मराठी भाषेमुळे देशाचं सांस्कृतिक वैविध्य अधिक समृद्ध होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, ठाणे तसंच वाशिम इथं विविध विकास कामांचं लोकार्पण
- संविधान रक्षणासाठी आरक्षणाची मर्यादा काढण्याचं खासदार राहुल गांधी यांचं आश्वासन
- छत्रपती संभाजीनगर इथं आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा
- एनआयए तसंच एटीएसची छत्रपती संभाजीनगरसह जालन्यात कारवाई-तीन जण ताब्यात
- मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास सुरू

  आणि

- महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत – पाकिस्तान सामना, तर भारत – बांगलादेश पुरुष संघांमध्ये आज पहिला टी ट्वेंटी सामना

****

मराठी भाषेमुळे देशाचं सांस्कृतिक वैविध्य अधिक समृद्ध होत असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल काल मुंबईत राज्य सरकारच्या वतीनं पंतप्रधानांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. पैठणीचा शेला, मराठी भाषेचं बोधचिन्ह, संत ज्ञानेश्वरांची

प्रतिमा आणि कवीवर्य कुसुमाग्रजांचा काव्यसंग्रह देऊन पंतप्रधानांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देतांना, मराठी भाषेला हा सन्मान म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेकाच्या साडे तीनशेव्या वर्षात संपूर्ण देशाने केलेला मानाचा मुजरा असल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली. ते म्हणाले...

**मराठी भाषेला हा दर्जा संपूर्ण देशाने छत्रपती शिवाजी महाराज यांना त्यांच्या राज्यभिषेकाच्या तीनशे पन्नासव्या वर्षात केलेला मानाचा मुजरा आहे. मराठी भाषा का इतिहास बहोत समृद्ध रहा है। इस भाषा से ज्ञान की जो धारायें निकली उन्होंने कई पिढीयों का मार्गदर्शन किया है। और वो आज भी हमें रास्ता दिखाती है।**

मराठी भाषेला हा दर्जा मिळाल्यानंतर या भाषेत संशोधन आणि शिक्षणाचं प्रमाण वाढेल, असं सांगत, जगभरात मराठी भाषा पोहोचली पाहिजे, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले, ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे, ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर, आदी मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, काल ठाणे इथं, ठाणे आणि मुंबईतल्या ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचं उद्धाटन आणि पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात आली, यामध्ये मुंबई मेट्रोच्या आरे ते वांद्रे कुर्ला संकुल या भूमिगत मेट्रो टप्प्याचं उद्धाटन, ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी, तसंच नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र विकासासाठी नैना प्रकल्पाच्या पायाभरणीचा समावेश आहे.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी इथं विविध विकास कामांचं उद्धाटन तसंच पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाला केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पशूसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राजीवरंजन सिंह, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी, देशाचं आर्थिक पातळीवर नेतृत्व करण्याची महाराष्ट्रात असीम क्षमता असून, सर्वांनी एकत्र येऊन विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी काम करण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले...

***साथीयों हमारे महाराष्ट्र मे देश के आर्थिक प्रगती का नेतृत्व करने की असीम क्षमता है। ये तभी होगा जब गांव, गरीब, किसान, मजदूर, दलित, वंचित सबको आगे बढाने का अभियान मजबुती से चलता रहेगा। मुझे विश्वास है, आप सब अपना आशीर्वाद बनाये रखेंगे। हम सब साथ मिलकर विकसित महाराष्ट्र, विकसित भारत के सपने को पुरा करेंगे।***

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १८ व्या, आणि प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या ५ व्या हप्त्याचं वितरण मोदी यांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प त्यांनी राष्ट्राला समर्पित केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थी महिलांना पंतप्रधानांच्या हस्ते धनादेश प्रदान करण्यात आले.

शेतीला दिवसा वीज पुरवठा करणासाठी १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सौर ऊर्जा प्रकल्पांचं लोकार्पण पंतप्रधानांनी केलं. छत्रपती संभाजीनगर, नांदेड, अकोला, बुलडाणा आणि कोल्हापूर जिल्ह्यात हे सौर प्रकल्प आहेत. हे प्रकल्प उभारायला मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना २० कोटी ५५ लाख रुपये विकासनिधी त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पोहरादेवी इथल्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्धाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. या चार मजली संग्रहालयात बंजारा समाजाची माहिती देणारी १३ प्रदर्शनं आहेत. जगदंबा देवी आणि सेवालाल महाराजांचं दर्शन घेऊन, पंतप्रधानांनी बंजारा समाजातल्या मान्यवरांची भेट घेतली.

****

संविधानाचं रक्षण करायचं असेल तर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा काढावी लागेल, असं मत, लोकसभेतले विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी व्यक्त केलं आहे. काल कोल्हापूर इथं संविधान सन्मान संमेलनात ते बोलत होते. आरक्षणाची ही मर्यादा इंडिया आघाडी हटवेल आणि संसदेत जातनिहाय जनगणनाही मंजूर करण्यात येईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. कोल्हापूर जिल्ह्यातल्या कसबा बावडा इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं राहुल गांधी यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं.

दरम्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी लंडनमध्ये कथित वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी राहुल गांधी यांना पुण्याच्या विशेष न्यायालयानं समन्स बजावलं आहे. येत्या २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहून बाजू मांडण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहेत.

****

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा, आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. शहरातल्या खडकेश्वर परिसरातल्या मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदानावर दुपारी दीड वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला जिल्ह्यातल्या लाभार्थी महिलांनी हजर राहण्याचं आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे.

***“मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या लार्भार्थींचा सन्मान मेळावा  आणि त्याच बरोबर शासकीय योजनेचा सुभारंभ माननीय  मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. जिल्हाभरातील सर्व महिला भगिनीला विनम्र आहवान आहे की आपण या कार्यक्रमला उपस्थिती लावावी”***

दरम्यान, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथल्या ८०० लाभार्थी भाविकांचा पहिला जत्था आज रेल्वेने अयोध्येला रवाना होणार आहे. याच योजनेअंतर्गत नांदेड इथून ज्येष्ठ नागरिकांना घेऊन पहिली रेल्वे येत्या १२ ऑक्टोबरला अयोध्येसाठी निघणार आहे.

राष्ट्रीय तपास यंत्रणा – एनआयए आणि दहशतवाद विरोधी पथक – एटीएसनं काल छत्रपती संभाजीनगर, जालना आणि मालेगाव इथं छापे टाकून चौघांना ताब्यात घेतलं. दहशतवादी संघटनांशी असलेले लागेबांधे आणि विघातक कृत्यातल्या सहभागाप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं किराडपुरा भागातून एक आणि एन–6 परिसरातून एक अशा दोन जणांना तर जालना इथल्या चमडा बाजार भागातून एका तरुणाला ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.

****

मोसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास कालपासून सुरू झाला. नंदुरबार जिल्ह्यातून काल मोसमी पाऊस परतल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. उर्वरीत महाराष्ट्रातूनही पुढच्या आठवड्यात मोसमी पाऊस पूर्णपणे परतून जाईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

श्रीक्षेत्र माहूर इथल्या स्कायवॉक आणि लिफ्टच्या कामाला गती देण्यात आली असून, लवकरच हे काम पूर्ण होईल, असा विश्वास, नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी व्यक्त केला आहे. या कामासाठी ५१ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मंदिर परिसरातील रस्ते तसंच इतर सुविधांचाही विकास केला जात असल्याचं राऊत यांनी सांगितलं.

****

नवरात्रादरम्यान तुळजापूर इथं येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य मंत्री डॉ तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून तीन ठिकाणी आरोग्य शिबीरं भरवण्यात आली आहेत. येत्या १८ तारखेपर्यंत ही शिबीरं चालणार आहेत. शहराकडे येणाऱ्या रस्त्यांवर १९ आरोग्य पथकं तैनात करण्यात आली असून, १३ रुग्णवाहिका तसंच आरोग्य दूतांची १५ पथकं तैनात आहेत.

****

संयुक्त अरब अमिराती इथं सुरु असलेल्या महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान संघात सामना होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल. काल या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया – श्रीलंका, तसंच इंग्लंड – बांग्लादेश यांच्यात सामने झाले.

दरम्यान, भारत आणि बांगलादेश पुरुष संघांमध्ये तीन टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यांची मालिका आजपासून सुरु होत आहे. मध्य प्रदेशात ग्वाल्हेर इथं खेळवला जाणारा हा सामना सायंकाळी सात वाजता सुरू होईल.

****

कृष्णा खोऱ्यातून धाराशिव जिल्ह्याला मिळणारं हक्काचं सात टीएमसी पाणी डिसेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यात येईल , अशी माहिती, आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली. तुळजापूर तालुक्यातल्या सिंदफळ इथं पंपग्रह पाहणी दरम्यान ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

परभणी जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांची नि:शुल्क आरोग्य तपासणी करण्याची सूचना राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉक्टर पी पी वावा यांनी केली आहे. काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. आगामी तीन महिन्यात ही तपासणी पूर्ण करण्याची सूचना त्यांनी केली.

****

लातूर जिल्हा परिषदेच्या ११८ शाळांमधल्या क्रीडांगण विकासासाठी ‘खेलो लातूर’ उपक्रम राबवला जात आहे. औसा तालुक्यात चलबुर्गा इथल्या मैदानाचं उद्घाटन नुकतंच मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते झाला.

****